# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Illegal Liquor**

**Police Station** :- **Karanja City**

**Date of Good Work done** :- **30/01/2023**

**Brief of the work done :-**

अवैध गावठी दारू अड्ड्यावर पो.स्टे. कारंजा शहर | पोलीसांची धाड ; 2.5 लाखांचा मुद्देमाल जप्त.

# अवैध दारुसह अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

## कारंजा पोलिसांची कारवाई ; एकाविरुद्ध गुन्हा दाखल



कारंजा, दि. २९ (प्रतिनिधी)

शहरातील अवैध देशी दारु विक्रीला पायबंद घालण्यासाठी पोलिसांकडून कारवाया केल्या जात आहेत. त्यानुसार २८ जानेवारीला पोलिसांनी अवैध देशी दारुसह २ लाख ५६ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करुन एकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

शहरापासून जवळच पोहा ते वालई मार्गावर एका चारचाकी वाहनातून अवैध देशी दारुची तस्करी केल्या जात असल्याची माहिती मिळाल्यावरुन पोलिसांनी छापा मारला. यावेळी एम.एच. ०६ ए.एफ-५७२२ या क्रमांकाच्या कारमध्ये ५६ हजारांच्या दारुची बेकायदेशीरपणे वाहतूक होत असल्याचे आढळून आले. ाप्रकरणी पोलिसांनी भडशिवणी येथील प्रदीप तेजुसिंग राठोड यास ताब्यात घेत कार व दारुसाठा असा २ लाख ५६ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. सदर कारवाई पोलीस निरीक्षक आधारसिंग सोनोने यांच्या मार्गदर्शनात एपीआय बी.सी.रेघीवाले, नितीन पाटील, अमित भगत, गजानन शिंदे, उमेशकुमार बिबेकर यांचया पथकाने केली आहे.